| | |
|---|---|
| MHGA030011452019 | दाखल तारीख : २३.१२.२०१९<br>नोंदणी तारीख : २३.१२.२०१९<br>निकालतारीख : २४.११.२०२५<br>कालावधी : ०५ वर्ष, ११ म., ०१ दि.<br>**निशाणी क्रमांक : ३२१ पुढे** |

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| | **२रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**समक्ष : श्रीमती. एन. ए. पठाण**<br>**न्यायनिर्णय पारीत दिनांक : २४/११/२०२५**<br>**संक्षिप्त फौजदारी मामला क्रं.६९५/२०१९** |
| | **गुन्हा क्र. ००६२/२०१८** |
| फिर्यादी/तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन, गडचिरोली, ता.जि. गडचिरोली. |
| फिर्यादी/तक्रारकर्ता तर्फे | श्री. भाऊराव के. खोब्रागडे<br>विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. प्रशांत शामराव पराते,**<br>वय : ३५ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>राह.चनकाईनगर, गडचिरोली, ता., जि.गडचिरोली.<br>**२. अतुल नवनाथ गेडाम,**<br>वय : २४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा.इंदिरानगर, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली.<br>**३. मदनया परदेशी कांबळे,**<br>वय : ३४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>राह.पोलीस वसाहत कॉम्प्लेक्स, ता.जि.गडचिरोली.<br>**४. जिवन सोमाजी पिपरे,**<br>वय : ४० वर्षे, व्यवसाय : शेती,<br>राह.बोदली, ता., जि.गडचिरोली.<br>**५. संजय शामराव भुरसे,**<br>वय ५४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा.इंदिरानगर, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. |

न्या. प्र.श्रेणी
(न्या.क्र.२)
गडचिरोली

| | |
|---|---|
| | **६. रुषी हिरामन मेश्राम,**<br>वय ५४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा.खरपुंडी, ता.जि.गडचिरोली.<br>**७. सचिन गजानन बावने,**<br>वय २५ वर्षे, व्यवसाय : शेती,<br>**८. वसंत सोमाजी लोहट,**<br>वय ४५ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>**९. विठ्ठल मादगु उसेंडी,**<br>वय ५८ वर्षे, व्यवसाय : मजुरी<br>तिन्ही रा.जांभळी, ता.धानोरा, जि.गडचिरोली.<br>**१०. अंकुश सुरेश खोब्रागडे,**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय : शेती<br>रा.चांदाळा टोला, ता.जि.गडचिरोली.<br>**११. खिराचंद नामदेव सरवर,**<br>वय ३० वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>**१२. रमेश सोमा भोयर,**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय : मजुरी<br>दोन्ही रा.जांभळी, ता.धानोरा, जि.गडचिरोली.<br>**१३. रवींद्र शालीकराम मेश्राम,**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा.गाकुलनगर वार्ड क्र.२, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. |
| आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ | श्री.आर. एस. दोनाडकर. |

**<u>भाग 'ब'</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ११.०२.२०१८ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | ११.०२.२०१८ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | २३.१२.२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २८.१०.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २४.११.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची | निरंक |

न्या. प्र.श्रेणी
(न्या.क्र.२)
गडचिरोली

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | १५.११.२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दाखल केलेसह | निर्दोष सुटला की नाही किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४२८ अन्वये खटल्यामध्ये न्यायालयाच्या कक्षेदरम्यान तुरुगांत राहल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत शामराव पराते, | आरोपींना अटक करण्यात आली नाही आरोपींना सुचनापत्र ावर सोडले | ११.०२.२०१८ | १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अतुल नवनाथ गेडाम, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ३. | मदनया परदेशी कांबळे, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ४. | जिवन सोमाजी पिपरे, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ५. | संजय शामराव भुरसे, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ६. | रुषी हिरामन मेश्राम, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ७. | सचिन गजानन बावने, | | ११.०२.२०१८ | | | | |
| ८. | वसंत सोमाजी लोहट | | ११.०२.२०१८ | | | | |
| ९. | विठ्ठल मादगु उसेंडी | आरोपींना | ११.०२.२०१८ | | | | |

न्या. प्र.श्रेणी
(न्या.क्र.२)
गडचिरोली

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | अंकुश सुरेश खोब्रागडे | अटक करण्यात आली नाही आरोपींना सुचनापत्र वर सोडले | ११.०२.२०१८ | १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा | निर्दोष | निरंक | निरंक |
| ११. | खिराचंद नामदेव सरवर | | ११.०२.२०१८ | | | | |
| १२. | रमेश सोमा भोयर | | ११.०२.२०१८ | | | | |
| १३. | रवींद्र शालीकराम मेश्राम | | ११.०२.२०१८ | | | | |

## **भाग 'क'**

**अ. अभियोग पक्ष**

| **अनु.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| सरकारी पक्षाचे सा.क्र.१ | पुरुषोत्तम दिनाजी बावने | पंच साक्षीदार |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.२ | आनंदराव हनुजी शेंदरे | पंच साक्षीदार |

**फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. फिर्यादी पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

न्या. प्र.श्रेणी
(न्या.क्र.२)
गडचिरोली

**अ. बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी घोषित)

अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. बी.के.खोब्रागडे यांचा तर आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर. एस. दोनाडकर यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ११.०२. २०१८ रोजी १८.३० ते २०.०० वाजताचे दरम्यान मौजा जांभळी गावालगत असलेल्या झुडपी जंगल परिसरात आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी कोंबडयाचे पायाला धारदार लोखंडी काती बांधुन कोंबडयास जखमी करण्याचे उद्देशाने कोंबडयाची झुंज लावुन लोकांकडुन पैसे घेवुन हारजितचा खेळ खेळत असतांना असतांना आरोपींकडुन नगदी रु.१२,४००/-, ०९ मोटारसायकल, १४ कोंबडे, ५ लोखंडी कात्या व १९ मोबाईल असा एकुण रु.३,६२,२५०:- चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपींनी महाराष्ट् जुगार कायदा कलम १२ (अ ) व प्राणी छळ प्रतिबंधक कायदा कलम ११ (१)(ड)(२)(द) अंतर्गत अपराध केला ? | **...नाही.** |
| २ | आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार** |

**का र ण मि मां सा**

२. महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियम कलम १२(अ) आणि प्राणी छळ प्रतिबंधक कायदा कलम ११ (१)(ड)(२)(द) अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपी हे लोकांकडुन कोंबडयाच्या झुंजीवर पैश्याची बाजी लावुन हारजितचा जुगाराचा खेळ खेळत असतांना साहित्य व रोख रकमेसह मिळुन आले हे अभियोग पक्षाला सिध्द करणे गरजेचे आहे. त्यासाठी अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींविरुध्द पुरावा मिळुन न आल्याने त्याचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३(१)(ब) अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

न्या.प्र.श्रेणी.
(न्या.क्र.२)
गडचिरोली

**मुददा क्रं.१ करिता :-**

३. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले घटनास्थळ जप्ती पंच पुरुषोत्तम

बावने(स.सा.क्रं.२) व घटनास्थळ जप्ती पंच आनंदराव शेंदरे(स.सा.क्रं.२२) यांना नि.क्र.३२१ पुढे तपासण्यात आले. सा.क्र.१ ने आरोपींना ओळखत नसल्याचे कथन केले आहे तर सा.क्र.२ ने काही ओळखत असल्याचे व काही आरोपींना ओळखत नसल्याचे कथन केले आहे. पुढे त्यांनी पंचनाम्याकरीता पोलीसांनी त्यांना सुचनापत्र दिले नव्हते व त्यांचेसमक्ष पोलीसांनी काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले. त्यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामावर त्यांची सही असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर दोन्ही साक्षदारांनी अभियोग पक्षाला कुठेही समर्थन केले नाही. त्यामुळे त्यांना अभियोग पक्षातर्फे सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनाशी विसंगत साक्ष दिली व पंचनाम्याची कार्यवाही नाकारली. सदर दोन्ही स्वतंत्र पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाला सहाय न केल्याने घटनास्थळ जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही आणि त्यामुळे गुन्हयाचे घटक आरोपींविरुध्द सिध्द झाले नाही.

४. याशिवाय सदर प्रकरणात पंच साक्षदाराने अभियोग पक्षाला समर्थन न केल्याने त्यांनी स्वत:ची बाजु नि.क्र.३२३ वरील पुरसीस नुसार बंद केली व इतर साक्षदार तपासण्याची तसदी घेतली नाही. महत्वाचे म्हणजे प्रकरणात जरीही आरोपींकडुन मुद्देमाल जप्त करण्यात आला असला तरीही स्वतंत्र पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाच्या कथनाशी सुसंगत साक्ष न दिल्याने पंचनाम्यातील मजकुर सिध्द होवु शकला नाही. त्यामुळे जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा आरोपींच्याच ताब्यातुन जप्त करण्यात आला होता हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयशी ठरले. तसेच दोन्ही पंच साक्षदारांनी जप्तीची कार्यवाही नाकारल्यामुळे आरोपींच्या ताब्यातुन झालेच्या जप्तीबाबत व सदरचा मुद्देमाल आरोपींच्याच ताब्यातुन जप्त केला किंवा कसे याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. महत्वाचे म्हणजे अभियोग पक्षाने फिर्यादी व तपासी अधिकारी यांची साक्ष न नोंदविल्याने फिर्यादमधील मजकुर व तपासातील महत्वाच्या बाबी सिध्द झाल्या नाहीत. करीता संशयाचा फायदा आरोपींना जावुन ते निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. दोन्ही पंच साक्षदार अभियोग पक्षाला समर्थन करीत नसल्याने आरोपींकडुन काहीही जप्त झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने त्यांचेविरुध्द कोणताही गुन्हादर्शक मजकुर अभिलेखावर आणला नाही व त्यामुळे अभियोग पक्ष आरोपींविरुध्द पुराव्याची श्रृखंला जोडण्यास अपयशी ठरलेला आहे. परिणामी मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी दर्शविते.

न्या.प्र.श्रेणी.
(न्या.क्र.२)
गडचिरोली

**<u>मुददा क्रं.२ करिता :-</u>**

५. वर उल्लेखलेल्या प्रमाणे आरोपींविरुध्द अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द केला नाही. गुन्हयात जप्त रोख रक्कम रु.१२,४००/- पोलीस स्टेशन मालखान्यात जमा आहे. सदर रकमेची कोणीही मागणी न केल्यास अपील कालावधीनंतर सदर रक्कम शासन जमा करणे योग्य होईल. त्यामुळे मी मुददा क्रं.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. **आरोपी क्र.१ प्रशांत शामराव पराते, आरोपी क्र.२ अतुल नवनाथ गेडाम, आरोपी क्र.३ मदनया परदेशी कांबळे, आरोपी क्र.४ जिवन सोमाजी पिपरे, आरोपी क्र.५ संजय शामराव भुरसे, आरोपी क्र.६ रुषी हिरामन मेश्राम, आरोपी क्र.७ सचिन गजानन बावने, आरोपी क्र.८ वसंत सोमाजी लोहट, आरोपी क्र.९ विठ्ठल मादगु उसेंडी, आरोपी क्र.१० अंकुश सुरेश खोब्रागडे, आरोपी क्र.११ खिराचंद नामदेव सरवर, आरोपी क्र.१२ रमेश सोमा भोयर व आरोपी क्र.१३ रवींद्र शालीकराम मेश्राम** यांना महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) व प्राणी छळ प्रतिबंधक कायदा कलम ११ (१)(ड)(२)(द) प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-२५५(१)/भारतिय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-४३७(अ)/भारतिय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रु.१५,०००/- ची जामीन दयावी. सदर जामीन पुढील सहा महिण्यापर्यंत अस्तित्वात राहील.

३. गुन्हयात जप्त मोटारसायकल व मोबाईल सुप्रतनाम्यावर सोडले असल्यास अपील कालावधीनंतर त्यांचा ताबा कायम समजण्यात यावा. तसेच जप्त रोख रक्कम रु. १२,४००/- पोलीस स्टेशन मालखान्यात जमा असल्याने व सदर रकमेची कोणीही मागणी न केल्यास ती अपील कालावधीनंतर शासन जमा करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NIKISHANAJ ASHRAFKHAN PATHAN
Date: 2025.11.27 10:21:26 +1100

स्थळ : गडचिरोली.
दिनांक : २४/११/२०२५.

(एन. ए. पठाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), गडचिरोली.